सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

# महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९

(दिनांक १५ जुलै, २००८ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. V of 2000

# Maharashtra Metropolitan Planning Committees (Constitution and Functions) (Continuance of Provisions) Act, 1999

*(As modified upto the 15th July, 2008)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००९

[ किंमत : रुपये ५.०० ]

# महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९

## (सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५)

अनुक्रमणिका

उद्देशिका

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**महानगर नियोजन समितीची रचना व कामे**

३. महानगर नियोजन समितीची रचना.

४. पदावधी व नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

५. सदस्यांना काढून टाकणे.

६. कामे पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

७. कार्यवाही योग्य व विधिग्राह्य असल्याचे गृहीत धरणे.

८. अध्यक्ष व सदस्य यांचे भत्ते.

९. महानगर नियोजन समितीची कामे.

प्रकरण तीन

**संकीर्ण**

१०. राज्य शासनाचे निदेश.

११. मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा अधिकार.

१२. नियम करण्याचा अधिकार.

१३. विवक्षित अधिनियमांत सुधारणा.

१४. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

१५. सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**अनुसूची**

एक. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७).

दोन. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४).

(शा.म.मु.) एच ४१११ (६,०६७—८-०९)

## सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

## महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ७ जानेवारी, २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**संपूर्ण महानगर क्षेत्रासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी प्रत्येक महानगर क्षेत्रामध्ये महानगर नियोजन समितीची रचना करण्याकरिता तरतूद करण्यासाठी; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

१९९९ चा महा. अध्या. १२. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक २९ जून, १९९९ रोजी महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर, १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर, राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर, १९९९ रोजी झाल्यामुळे, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत वेळेअभावी प्रस्तुत करता आले नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या दिनांकास सहा आठवड्यांचा कालावधी संपतो, त्या ३ डिसेंबर, १९९९ या दिनांकानंतर जारी असण्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे जारी असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी जारी असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळें आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून, उक्त अध्यादेश मागे घेऊन त्याचे निरसन करण्यात आले होते आणि दिनांक २ डिसेंबर, १९९९ रोजी महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ हा भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच २९ जून, १९९९ पासून प्रख्यापित करण्यात आला होता ; १९९९ चा महा. अध्या. २६.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, चे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:— १९९९ चा महा. अध्या. २६.

### प्रकरण एक
### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीतील परिच्छेद ६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, भारताच्या राष्ट्रपतींनी वेळोवेळी घोषित केलेली अनुसूचित क्षेत्रे वगळून, तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २९ जून, १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(क) " अनुच्छेद " याचा अर्थ, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद, असा आहे ;

(ख) " विकास योजना " याचा अर्थ, अनुच्छेद २४३ यङ च्या तरतुदींशी सुसंगत असणारा, या अधिनियमान्वये महानगर नियोजन समितीने तयार केलेला विकास योजनेचा मसुदा, असा आहे ;

(ग) " महानगर क्षेत्र " याचा अर्थ, अनुच्छेद २४३ त च्या खंड (म) अन्वये राज्यपालांनी विनिर्दिष्ट केलेले महानगर क्षेत्र, असा आहे ;

(घ) " नगरपालिका " याचा अर्थ, अनुच्छेद २४३ त च्या खंड (ङ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असणारी नगरपालिका, असा आहे ;

(ङ) " पंचायत " याचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये ग्रामस्तरावर रचना केलेली ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये मध्यम व जिल्हा स्तरावर रचना केलेल्या अनुक्रमे, पंचायत समित्या व जिल्हा परिषदा, असा आहे ; १९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

(च) " लोकसंख्या " याचा अर्थ, जिची संबंधित आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे अशा लगत पूर्ववर्ती जनगणनेच्या वेळी निश्चित करण्यात आलेली लोकसंख्या; असा आहे ;

(छ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

## प्रकरण दोन

## महानगर नियोजन समितीची रचना व कामे

महानगर नियोजन समितीची रचना.

**३.** (१) संपूर्ण महानगर क्षेत्रासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करण्याकरिता प्रत्येक महानगर क्षेत्रासाठी पोट-कलम (२) अन्वये तरतूद करण्यात येईल त्याप्रमाणे, पंचेचाळीस सदस्यांचा समावेश असलेल्या एका महानगर नियोजन समितीची रचना करण्यात येईल.

(२) प्रत्येक महानगर नियोजन समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल:—

**एक. पदसिद्ध सदस्य—**

(क) शासनाचे प्रधान सचिव किंवा सचिव, नगरविकास विभाग ;

(ख) संबंधित महसूल विभागाचे विभागीय आयुक्त.

**दोन. नामनिर्देशित सदस्य—**

(क) राज्य शासनाकडून अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती ;

(ख) महानगर क्षेत्रात कार्यरत असलेल्या महानगरपालिकांचे आयुक्त, नगरपरिषदांचे मुख्याधिकारी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६अन्वये रचना करण्यात आलेल्या विशेष नियोजन प्राधिकरणांचे किंवा नवनगर विकास प्राधिकरणांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणांचे सदस्य यांच्यामधून, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात आलेले सहा सदस्य ; १९६६ चा महा. ३७.

(ग) महानगर क्षेत्रामधून निवडून आलेले विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य यांच्यामधून, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात आलेले दोन सदस्य ;

(घ) नगरविकास, नागरी पायाभूत सोयी, वित्तव्यवस्था, नगर परिवहन, पर्यावरण, उद्योग व व्यापार आणि नागरी सामूहिक विकास यांमधील अनुभव आणि विशेष ज्ञान असलेले, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात आलेले चार सदस्य.

**तीन. निर्वाचित सदस्य—**

(क) महानगर नियोजन समितीच्या एकूण सदस्यांपैकी दोन-तृतीयांशाहून कमी नसतील एवढे सदस्य हे, महानगर क्षेत्रातील नगरपालिकांचे निर्वाचित सदस्य आणि पंचायतींचे अध्यक्ष यांच्याद्वारे आणि त्यांच्यामधून, त्या क्षेत्रातील नगरपालिकांच्या आणि पंचायतींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निवडण्यात येतील ;

(ख) महानगर नियोजन समितीवर खंड (क) अन्वये निवडून द्यावयाचे सदस्य हे, त्या प्रयोजनाकरिता निश्चित करण्यात आलेल्या निर्वाचक गणामधील मतदारांमधून एकल संक्रमणीय मताद्वारे निवडण्यात येतील ;

(ग) सदस्यांची निवडणूक ही, खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीस अनुसरून, विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याद्वारे किंवा अधिकाऱ्याद्वारे आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने घेण्यात येईल ;

(घ) महानगर नियोजन समितीच्या एखाद्या सदस्याच्या कोणत्याही निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबाबत जर एखादा प्रश्न, ज्या निवडणुकीशी तो प्रश्न संबंधित असेल त्या निवडणुकीत मतदान करण्यास पात्र असलेल्या इतर कोणत्याही सदस्याने उपस्थित केला तर, त्या बाबतीत विहित करण्यात येईल असा प्राधिकारी, अशा मुदतीच्या आत आणि अशी कार्यपद्धती अनुसरून निर्णय देईल.

**चार. विशेष निमंत्रित—**

पुढील व्यक्ती या, महानगर नियोजन समितीच्या सर्व बैठकींसाठी विशेष कायम निमंत्रित असतील आणि त्यांना समितीच्या बैठकींमधील चर्चाविमर्शात भाग घेण्याचा हक्क असेल:—

(क) महानगर क्षेत्रातून निवडून आलेले किंवा सामान्यत: त्या क्षेत्रातील रहिवासी असलेले संसद सदस्य आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती ;

(ख) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी ;

(ग) नगररचना संचालक किंवा त्या त्या प्रदेशांचे नगररचना उप संचालक ;

(घ) यथास्थिति, रेल्वे, दूरध्वनी विभाग किंवा बंदर विश्वस्तमंडळ यांसारख्या भारत सरकारच्या संघटनांचे प्रतिनिधी.

(३) महानगर नियोजन समितीचा सचिव म्हणून राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येईल असा, शासनाच्या उप-सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी.

(४) महानगर नियोजन समितीच्या कोणत्याही बैठकीला अध्यक्ष अनुपस्थित असेल तर, बैठकीचा अध्यक्ष म्हणून काम पाहण्यासाठी सदस्य आपल्यामधून एकाची निवड करतील.

पदावधी व नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

४. (१) नामनिर्देशित सदस्यांचा पदावधी, राज्य शासन महानगर नियोजन समितीवर त्यांना नामनिर्देशित करताना विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.

(२) महानगर नियोजन समितीवर निवडून देण्यात आलेल्या सदस्यांचा पदावधी, संबंधित स्थानिक प्राधिकरणामधील त्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल.

(३) नामनिर्देशित करण्यात आलेला किंवा निवडून देण्यात आलेला कोणताही सदस्य, स्वत:च्या सहीनिशी राज्य शासनास संबोधून लिहिलेल्या पत्राद्वारे त्याच्या पदाचा राजीनामा देऊ शकेल. राजीनामा राज्य शासनास ज्या दिनांकास मिळेल त्या दिनांकापासून तो अंमलात येईल.

(४) अशा राजीनाम्यामुळे अथवा एखाद्या सदस्याचा मृत्यू किंवा असमर्थता यांसारख्या कोणत्याही इतर कारणामुळे निर्माण होणारे कोणतेही नैमित्तिक रिक्त पद, शक्य तितक्या लवकर, यथास्थिति, नामनिर्देशनाद्वारे किंवा निवडणुकीद्वारे भरले जाईल :

परंतु, अशाप्रकारे नामनिर्देशित केलेला किंवा निवडून दिलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्याला नामनिर्देशित करण्यात आलेले असेल किंवा निवडून देण्यात आलेले असेल त्या सदस्याने ज्या उर्वरित अवधीपर्यंत ते पद धारण केले असते त्या अवधीपर्यंतच पद धारण करील.

सदस्यांना काढून टाकणे. **५.** राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे महानगर नियोजन समितीच्या एखाद्या सदस्याला, पुढील बाबतीत पदावरून काढून टाकता येईल :—

(क) महानगर क्षेत्रातील नगरपालिका किंवा पंचायती यांनी तयार केलेल्या परियोजनांमध्ये किंवा योजना आणि परियोजना यांत समाविष्ट असलेल्या कामांमध्ये त्याचा कोणताही आर्थिक हितसंबंध असेल तर ;

(ख) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींअन्वये शिक्षापात्र असलेल्या, नैतिक अध:पाताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल त्याला दोषी ठरवण्यात आले असेल तर; किंवा

(ग) निवडणूक विनंतीअर्जाच्या न्यायचौकशीत तो भ्रष्टाचाराबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल तर.

कामे पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती. **६.** महानगर नियोजन समितीने कामे पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

कार्यवाही योग्य व विधिग्राह्य असल्याचे गृहीत धरणे. **७.** महानगर नियोजन समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, जर ती अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार असेल तर, केवळ त्या समितीमधील एखादे पद रिक्त असल्याच्या किंवा कोणत्याही सदस्याच्या निवडणुकीमध्ये किंवा नामनिर्देशनामध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणामुळे विधिअग्राह्य ठरणार नाही.

अध्यक्ष व सदस्य यांचे भत्ते. **८.** महानगर नियोजन समितीचा अध्यक्ष व इतर सदस्य यांना, राज्य शासन, वेळोवेळी निश्चित करील असे भत्ते मिळतील.

महानगर नियोजन समितीची कामे. **९.** महानगर नियोजन समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :—

(क) महानगर क्षेत्रातील नगरपालिका व पंचायती यांनी तयार केलेल्या योजना विचारात घेऊन, त्या महानगर क्षेत्रासाठी विकास योजनेचा मसुदा तयार करणे ;

(ख) संविधानाच्या अनुच्छेद २४३ यङ याच्या खंड (३) च्या तरतुदींचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ग) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची महानगर नियोजन समितीच्या अध्यक्षामार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे.

## प्रकरण तीन
## संकीर्ण

राज्य शासनाचे निदेश. **१०.** राज्य शासनास, महानगर नियोजन समितीला कामकाजासंबंधात अथवा राज्य शासनाला समितीशी विचारविनिमय करणे योग्य वाटेल अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात वेळोवेळी निदेश देता येतील. असे निदेश मिळाल्यानंतर समिती त्यांचे पालन करील.

मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचा अधिकार. **११.** महानगर नियोजन समितीस योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे अधिकार असतील ; नगरपालिका व पंचायती त्यांच्या स्वत:च्या योजना तयार करताना या तत्त्वांचे पालन करतील.

नियम करण्याचा अधिकार. **१२.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या

दोन अधिवेशनांत मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यांमुळे त्या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**१३.** या अधिनियमाचा प्रारंभ झाल्याच्या दिवशी आणि तेव्हापासून, या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले अधिनियम, त्यात नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत आणि रीतीने सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे लागू असतील. विवक्षित अधिनियमांत सुधारणा.

**१४.** या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणताना जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनाला, प्रसंगानुसार, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

१९९९ चा महा. अध्या. २६. **१५.** (१) महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

(कलम १३ पहा)

**एक. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७).**

उक्त अधिनियमाच्या कलम ४ मधील, पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

२००० चा महा.५. " (१क) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, त्या पोट-कलमाच्या तरतुदी, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ग) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या महानगर क्षेत्राला लागू असणार नाहीत.".

**दोन. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४)**

(क) उक्त अधिनियमाच्या कलम २ मधील, खंड (च) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

२००० चा महा.५. " परंतु, प्रादेशिक योजना याचा अर्थ, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ याच्या तरतुदीअन्वये महानगर नियोजन समितीने तयार केलेली विकास योजना, असा देखील असेल ;";

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम १२ मधील, पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) या अधिनियमात किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकरण, महाराष्ट्र महानगर नियोजन समिती (रचना व कामे) (तरतुदी पुढे चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ अन्वये स्थापन केलेल्या महानगर नियोजन समितीस त्या अधिनियमान्वये विकास योजना तयार करण्यामध्ये सहाय्य करील ". २००० चा महा. ५.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई